पाहिजे आरोपी 1) कमल अग्रवाल, 2) अमित अग्रवाल, 3) आकाश अग्रवाल, 4) विमल अग्रवाल 5) गिरीश अग्रवाल यांनी ॲक्सीस बॅक अंधेरी पूर्व मुंबई शाखेचे अधिकारी विभु मिश्रा, अंजली श्रीवास्तव, स्वाती चांडक, आशिष मेहता, काफीलुर रहमान यांच्याशी संगनमत करुन कंपनीच्या नियमांचा भंग करुन सुप्रीम ट्रान्सपोर्ट कंपनीच्या नावाने ॲक्सीस बॅकेत फिर्यादी यांच्या संमतीशिवाय नवीन खाते उघडुन व बॅकेला खोटी कागदपत्रे व कंपनीची जॉईंट प्रॉपर्टी गहाण ठेवुन अन्यायाने बृध्दीपुरस्सर त्यावर 24.90 कोटीचे कर्ज घेवुन सदर कर्ज घेतेवेळी फिर्यादीची संमती न घेता, तसेच बॅकेला कंपनीत वाद चालु असून ते मा. न्यायालयात तसेच नॅशनल कंपनी लॉ ट्रीब्युनल येथे तक्रार प्रलंबीत असल्याचे माहिती असुन देखील बॅकेतील वर नमूद 6 ते 10 हया पाहिजे आरोपींनी पाहिजे आरोपी क्र. 1 ते 5 यांना कंपनीवर कर्ज मंजुर करुन देवुन फिर्यादी यांची फसवणूक केली. म्हणून सदर प्रकरणी फिर्यादी यांनी मा. महानगर दंडाधिकारी 67 वे न्यायालय बोरीवली मुंबई यांच्याकडे अर्ज केला होता. त्यावर मा. न्यायालयाने सदर प्रकरणी 156(3) फौदंप्रसं अन्वये गुन्हा दाखल करुन तपास करण्याचे आदेश गोरेगांव पोलीस ठाणेस दिले.

त्यानुसार फिर्यादी यांची नमूद कंपनी ही मेसर्स सुप्रीम ट्रान्सपोर्ट ऑर्गनायझेशन प्रायव्हेट लीमिटेड, अक्षय मित्तल इंडस्ट्रीज इस्टेट एस.व्ही.रोड अंधेरी पूर्व मुंबई याठिकाणी असल्याने तसेच कर्ज मंजुर करणारी ॲक्सीस बॅक ही देखील अंधेरी येथील आहे. सदरचे घटनास्थळी हे सहार पोलीस ठाणेच्या हद्दीमध्ये असल्याने सदरबाबत 00/2017 कलम 406,420,467, 468, 471,34 भादंविसं. अन्वये गुन्हा नोंद करुन सदरचा गुन्हा पुढील तपासकामी मा. वरिष्ठांच्या मार्फतीने नोटींग तयार करुन सहार पोलीस ठाणेस वर्ग करण्याकरीता मा. पोउआ, परि-8 यांच्याकडे पाठविला. परंतु सदरबाबत मा. न्यायालयाने सहार पोलीस ठाणेस गुन्हा नोंद करुन तपास करण्याबाबत लेखी आदेश दिले नसल्याने सदर 00/17 अन्वयेची कागदपत्रे पुन्हा गोरेगांव पोलीस ठाणेस प्राप्त झाली. त्यानुसार नमूद प्रकरणी फिर्यादी यांच्या जबाबावरुन गोरेगांव पोलीस ठाणेस गुन्हा नोंद क्रमांक 133/2018 अन्वये नोंद करुन गुन्हयाचा तपास गोरेगांव पोलीस ठाणेस सुरु केला.

**तपास** - सदर गुन्हयाच्या तपासामध्ये यापूर्वीच्या तपास अधिकारी यांनी फिर्यादी यांना पाहिजे आरोपींनी कोणती बनावट कागदपत्रे बॅकेमध्ये कर्ज घेण्याकरीता सादर केली याबाबत त्यांच्याविरुध्द पुराव्याची कागदपत्रे सादर करण्याबाबत, तसेच पाहिजे आरोपींना देखील तपासकामी हजर राहून गुन्हया संबंधात कागदपत्रे सादर करण्याबाबत वारंवार फौदंप्रसं 41(1) अन्वये नोटीस दिल्या होत्या. फिर्यादी यांच्याकडे पोनि जयवंत पवार यांनी आरोपींनी कर्ज घेण्याकरीता कोणती खोटी कागदपत्रे बॅकेत सादर केली याबाबत तपास केला असता फिर्यादी यांनी काहीही ठोस माहिती दिली नाही. तसेच फिर्यादी यांनी कर्जासाठी त्यांच्या सहया न घेताच बोर्ड रिझोलेशन बनवुन सादर केले यासच खोटी कागदपत्रे सादर केली असे म्हंटले आहे.

तसेच फिर्यादी यांनी यातील आरोपींना कर्ज मंजुर होण्यापूर्वी ॲक्सीस बॅक, महिंन्द्रा कोटक बॅक व इतर बॅकांना मेसर्स सुप्रीम ट्रान्सपोर्ट ऑर्गनायझेशन प्रायव्हेट लीमिटेड या कंपनीमध्ये अंतर्गत वाद चालु असुन त्याबाबत एन.सी.एल.टी. मध्ये दावा चालू असून यातील आरोपींना कर्ज मंजुर करण्यात येवु नये असे बॅकांना कळविल्याबाबतचे ई मेल्स सादर केले आहेत.

तसेच फिर्यादी यांनी यातील पाहिजे आरोपी क्र. 1 ते 5 यांच्याविरुद्ध पुराव्याची कोणतीही कागदपत्रे सादर केली नाहीत. तसेच पाहिजे आरोपींपैकी श्रीमती अंजली श्रीवास्तव, काफीलुर रहमान व विभु मिश्रा हे पोलीस ठाणेस हजर राहील्याने त्यांचे जबाब नोंदविण्यात आले आहेत. त्यामध्ये अंजली श्रीवास्तव यांनी सांगीतले की, कंपनीचे डायरेक्टर श्री कमल अगरवाल यांनी श्री रविंद्र अगरवाल यांचा त्यांचे कंपनी बरोबर काहीही संबंध नसल्याचे सांगून त्याबाबत सिटी सिव्हील कोर्ट, दिंडोशी मुंबई येथे श्रीमती सिमा सुमित पहाडे यांनी केलेल्या दाव्याच्या सुनावणीच्या निकालाची प्रत, तसेच एन.सी.एल.टी. प्राधिकरणाचे सुनावतील आदेशातील प्रत ॲक्सीस बॅकेकडे सादर केली. तसेच सदर आदेशामध्ये श्री रविंद्र अगरवाल यांनी सिमा पहाडे यांच्या वडीलांच्या शेअर्सवर हक्क दाखविलेला ग्राहय नसल्याचे स्पष्ट नमूद आहे. तसेच एन.सी.एल.टी. प्राधिकरणाच्या आदेशामध्ये श्री रविंद्र अगरवाल यांचे वतीले त्यांचे वकीलांनी रविंद्र अगरवाल हे कोणत्याही बॅकेस पत्र व्यवहार करणार नाहीत अशी हमी दिल्याचे नमूद असल्याबाबत तपास अधिकारी यांनी केस डायरी क्र. 23/21 मध्ये नमूद केले आहे.

तसेच पाहिजे आरोपी विभु मिश्रा यांनी त्यांच्या जबाबामध्ये सांगीतले की, ते ॲक्सीस बॅक अंधेरी जेबी नगर ब्रॅच अंधेरी पूर्व मुंबई येथील बॅकेमध्ये मॅनेजर म्हणून कामकाज पहात होते. त्यावेळी सुप्रीम ट्रान्सपोर्ट कंपनीला ॲक्सीस बॅकेच्या कर्ज मंजुर करण्याच्या एस.एम.ई. डिपार्टमेंट पाहिला माळा कारपोरेट पार्क – 2 स्वस्तीक चेम्बर्स जवळ, सायन ट्राम्बे रोड चेंबुर मुंबई शाखेने त्यांना कर्ज मंजुर केल्याने ते काम करत असलेल्या अंधेरी जे.बी.नगर शाखेत त्यांचे चालु खाते उघडण्याबाबत त्यांना एस.एम.ई. डिपार्टमेंट मधुन सांगण्यात आले. सदरबाबत त्यांनी त्यांच्या शाखेतील चालु खाते उघडणा-या कर्मचा-यास त्यांच्या सुप्रीम ट्रान्सपोर्ट ऑरगनायझेशन प्रा.ली. 5/बी/34 अक्षय मित्तल इंडस्ट्रीयल इस्टेट एस.व्ही.रोड अंधेरी पूर्व मुंबई या कार्यालयात जावुन त्यांचे खाते उघडण्याकरीता आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करुन तसेच नमूद कंपनीचे डायरेक्टर श्री अमित अगरवाल व आकाश अगरवाल हे बोर्ड रेझुलेशन मधील अटी व शर्तीच्या अधिन राहून बोर्ड ऑफ डायरेक्टर यांच्यापैकी दोन याप्रमाणे दोघाच्या प्रत्यक्ष बॅकेमध्ये आल्यावर सहया घेण्यात आल्या व त्यांचे चालु खाते उघडण्यात आले.

नमूद सुप्रीम ट्रान्सपोर्ट कपनीला कर्ज मंजुर करण्याबाबत त्यांना कोणतीही माहिती नाही कारण की कर्ज मंजुर करण्याकरीता एस.एम.ई. डिपार्टमेंट पाहिला माळा कारपोरेट पार्क – 2 स्वस्तीक चेम्बर्स जवळ, सायन ट्राम्बे रोड चेंबुर मुंबई या शोखेला अधिकार आहेत. नमूदवेळी त्यांच्या माहितीप्रमाणे त्याठिकाणी श्रीमती स्वाती चांडक व श्रीमती अंजली श्रीवास्तव या दोघी काम पहात होत्या. त्यांनी सुप्रीम ट्रान्सपोर्ट कंपनीला मंजुर केलेल्या कर्जाबाबत त्यांना कोणतीही माहिती नाही असे त्यांनी त्यांच्या जबाबात नमूद केले आहे. तसेच त्यांनी सुप्रीम ट्रान्सपोर्ट कंपनीच्या नावे ॲक्सीस बॅकेत चालू खाते उघडण्याकरीता घेण्यात आलेली कागदपत्रे सादर केली असून ती गुन्हयाच्या कागदोपत्री समाविष्ट करण्यात आल्याचे तपास अधिकारी यांनी केस डायरी क्र. 25/21 मध्ये नमूद केले आहे.

नमूद गुन्हयातील फिर्यादी रविंद्र आनंद अग्रवाल,वय 29 वर्षे यांना वेळोवेळी भ्रणध्वनीवर संपर्क साधुन पाहिजे आरोपींनी बॅकेकडुन कर्ज घेताना कोणती बनावट कागदपत्रे बॅकेस सादर केली आहेत याबाबतची कागदपत्रे घेवुन तपासकामी पोलीस ठाणेस हजर राहण्याबाबत कळविले. परंतु फिर्यादी हे अद्याप पोलीस ठाणेस पाहिजे आरोपींविरुध्द त्यांच्याकडे असलेल्या पुराव्याच्या कागदपत्रांसह पोलीस ठाणेस हजर राहीलेले नाहीत. त्याचप्रमाणे यातील पाहिजे आरोपी क्र. 1 ते 5 यांना देखील त्यांनी बॅकेतुन कर्ज घेताना कोणती कागदपत्रे बॅकेस सादर केली आहेत त्या कागदपत्रांसह व इतर काही कागदोपत्री पुरावे असल्यास त्याच्यासह तपासकामी पोलीस ठाणेस हजर राहण्याबाबत आम्ही त्यांच्या भ्रमणध्वनीवर कळविले. परंतु पाहिजे आरोपी देखील अद्याप पोलीस ठाणेस हजर राहीलेले नाहीत.

यातील फिर्यादी यांच्याकडे तसेच पाहिजे आरोपींकडे गुन्हयाच्या अनुषंगाने तपास करणे आवश्यक असून त्यांना वेळोवेळी तपासकामी हजर राहयाबाबतची पत्र देवून देखील फिर्यादी व पाहिजे आरोपी तपासकामी पोलीस ठाणेस हजर राहीलेले नाहीत. यावरुन फिर्यादी व पाहिजे आरोपींना नमूद गुन्हयामध्ये कोणतेही स्वारस्य नसल्याचे दिसुन येत नाही. तसेच सदर प्रकरणी मा. दिवाणी सत्र न्यायालय, दिंडोशी मुंबई यांच्या न्यायालयामध्ये दावे दाखल असून सदरचे दावे प्रलंबीत आहेत.

नमूद गुन्हयातील फिर्यादी यांना नमूद गुन्हयामध्ये कोणताही रस नसल्याचे तपासामध्ये निष्पन्न झालेले आहे. तसेच फिर्यादी व पाहिजे आरोपी हे कंपनीचे पार्टनर असून त्यांच्या कंपनीतील वादामुळे फिर्यादी यांनी पाहिजे आरोपींविरुध्द सदरचा गुन्हा दाखल केला असल्याचे तपासामध्ये दिसुन आले आहे.

नमूद गुन्हयाच्या तपासामध्ये आरोपींना अटक करणेकामी त्यांच्याविरुध्द काहीही ठोस पुरावे उपलब्ध झालेले नाहीत. तसेच फिर्यादी यांनी देखील आरोपींविरुध्द काहीही कागदोपत्री पुरावे सादर केलेले नाहीत. तसेच सदर गुन्हयामध्ये फिर्यादी यांचे कोणतेही नुकसान झालेले नाही. फिर्यादी व पाहिजे आरोपी क्र. 1 ते 5 हे कंपनीमध्ये भागीदार असून त्यांच्यात वाद असल्याने त्याबाबत मा. दिवाणी सत्र न्यायालय, दिंडोशी मुंबई यांच्या न्यायालयामध्ये दावे दाखल असून सदरचे दावे प्रलंबीत आहेत. फिर्यादी यांनी त्यांचे भागीदार पाहिजे आरोपी 1 ते 5 यांनी त्यांना कर्जाबाबत काहीही माहिती न देता बॅकेतुन कर्ज घेतल्याच्या रागातुन व त्यांच्यामध्ये असलेल्या वादामुळे सदरचा गुन्हा नोंद केलेला आहे. त्यामुळे सदरचा गुन्हा हा गैरसमजुतीने दिलेला असल्याची खात्री झालेली आहे.

फिर्यादी श्री. रविंद्र आनंद अग्रवाल,वय 29 वर्षे, यांनी दिलेली तक्रार ही त्यांच्या व्यवसायातील आंतरगीक वादामुळे दिलेली असून ती गैरसमजुतीने दिलेली असल्याबाबत तपासामध्ये स्पष्ट झालेले असल्याने सदर गुन्हयाची तक्रार ही गैरसमजुतीने फिर्याद दिलेली असून सदर **गुन्हयाची " क " समरी वर्गीकरण** होण्यास विनंती आहे. झाले तपासाचे कागदपत्रे फेरीस्त 1 ते ....... सोबत ठेवण्यात आले आहेत.

17. Refer notice served ............... Yes / No .............. Date ...............
संदर्भ नोटीस बजावली होय / नाही तारीख

( Acknowledgement to be placed ) ( पोचपावती सादर करावी )

18. Despatched on
पाठविण्याची तारीख

Forwarded by Station House Officer/Officer Incharge

Signature of Investigating Officer

submitting the final report/ChargeSheet
ठाणे अंमलदार/प्रभारी अधिकाऱ्याने अग्रेषित केलेअंतिम अहवाल/आरोपपत्र सादर करणाऱ्या

तपासी अधिकाऱ्याची सही

**Name** (नांव) ( दत्तात्रय थोपटे )
Rank (पदनाम) वरिष्ठ पोलीस निरीक्षक
गोरेगांव पोलीस ठाणे, मुबई

**Name** (नांव) सुधीर हिरडेकर
Rank (पदनाम) पोलीस निरीक्षक,
गोरेगांव पोलीस ठाणे,मुंबई

FORM-1 A

N.C.R.B.
I.I.F.-1

225

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State: महाराष्ट्र, जिल्हा District: मुंबई, पोलीस ठाणे Police Station: गोरेगाव, पहिली खबर क्र. FIR No.: 133, वर्ष Year: 2018 दिनांक Date: 6/3/18

2. (i) अधिनियम Act: भादवि, कलमे Sections: 406, 420, 467, 468, 34.
   (ii) अधिनियम Act ........................, कलमे Sections ........................
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........................

3. (a) अपराधाचा घटना : वार 2015 ते आजपर्यंत. तारीख पासून ............, वेळ ............, तारीख पर्यंत ............, वेळ ............
   Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S. तारीख Date: 5/12/17, वेळ Time: 13.40 वा.
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: 01/18, तारीख Date: 6/3/18, वेळ Time: 00.05 वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information: मा. 67 वे न्यायालय, बोरिवली यांचे आदेशाने. लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S. ............, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No. ............
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: सुप्रीम ट्रान्सपोर्ट कंपनी, अक्षय मित्तल इंडस्ट्रियल इस्टेट, म.व. रोड, अंधेरी पूर्व. ठिकाणाचे नंबर No. if any ............, गल्ली Ward ............, रस्त्याचे नाव Name of road ............
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place ............, गाव Village ............, पोस्ट Post ............, तालुका Taluka ............, जिल्हा Distt. ............, राज्य State ............
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ............, तालुका Taluka ............, जिल्हा Distt. ............, राज्य State ............

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name: श्री रविंद्र अग्रवाल (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name: आनंद अग्रवाल.
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age: 39 वर्षे. (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय, फोन नं. Phone No.: 9867279394.
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ............ हिंदु, दिल्याचा दिनांक Date of Issue ............, दिल्याचे ठिकाण Place of Issue ............, (f) व्यवसाय Occupation ............
   (g) धर्म Religion ............, जात Caste ............, उपजात Sub-Caste ............
   (h) पत्ता Address : 233, कल्पतरु पिनॅकल, इनॉर्बिट मॉल समोर, गोरेगाव (प) मुंबई. गल्ली / सर्व नं. Ward ............, घर / नाव नंबर House/Name No. ............, फोन / मो. नंबर Phone/M. No. ............, पॅन नं. Pan No. ............, वोटर्स नं. Card No. ............
   रस्त्याचे नाव Road ............, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ............, गाव Village ............, पोस्ट Post ............, पो. स्टे. P. Stn. ............
   तालुका Taluka ............, जिल्हा Distt. ............, राज्य State ............, सध्याचा पत्ता Present Address ............

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

1) कमल अग्रवाल 2) अमित अग्रवाल 3) आकाश अग्रवाल 4) विमल अग्रवाल 5) गिरीश अग्रवाल 6) बिष्णु मिश्रा 7) अंजली श्रीवास्तव 8) स्वाती चौडक 9) आशिष मेहरा 10) काफिलुर रेहमान.

जबाब दि. ७/३/१८.

फिर्यादी श्री रविंद्र आनंद अग्रवाल वय. ३७ वर्षे यांचा संगणकावर टंकलिखीत केलेला सविस्तार जबाब यासह नमुद गुन्ह्याची प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात येत आहे.

समक्ष

Sonawane

कविता सोनवणे
पोलिस उपनिरीक्षक
गोरेगाव पोलिस ठाणे
मुंबई

स.पो.आ  व.पो.नि.  पो.नि. (गुन्हे)

07 MAR 2018

जबाब दिनांक ६/३/१८

श्री.रविंद्र आनंद अग्रवाल, वय २९ वर्षे, व्यवसाय—व्यवसाय, पत्ता – फ्लॅट नं २३३/१५३ कल्पतरु पिनॅकऊ,इनॉर्बिट मॉलसमोर,लिंक रोड,गोरेगाव पश्चिम मुंबई ९८६७२७९३९४.

.........................

मी वरीलप्रमाणे असुन वर नमुद पत्त्यावर गेलया ३वर्षापासुन आई नामे पुष्पादेवी,वडील आनंद ,पत्नी अंकीता व मुलगा निर्वाण असे रहावयास आहे.

माझे वडील आनंद व काका किशन अग्रवाल, जगदीश अग्रवाल, कमल अग्रवाल,यांनी १९८३मध्ये सुप्रीम ट्रान्सपोर्ट आर्गनायझेशन ही फर्म चालु केली होती तिचे नंतर २००८मध्ये तिचे सुप्रीम ट्रान्सपोर्ट आर्गनायझेशन प्रायव्हेट लिमीटेड असे नामकरण करण्यात आले.सदर कंपनी ही अक्षय मित्तल इंडस्ट्रियल इस्टेट, एम.व्ही.रोड,अंधेरी पुर्व मुंबई येथे स्थित आहे. सदर कंपनीत मी २०१० पासुन कंपनीत काम बघत होतो.व २०१३ पासुन मी कंपनीचा डायरेक्टर म्हणुन सर्वांसोबत काम करण्यास सुरवात केली.सदर कंपनीत आनंद अग्रवाल,सतिश अग्रवाल,अरुण अग्रवाल व मी असे आम्ही ४८टक्के शेअर्सचे मालक आहे व कमल अग्रवाल,गिरीश व विमल हे ५२टक्के शेअर्सचे मालक आहे. तसेच कंपनीच्या स्पेशल रिझोल्युशनसाठी ७५ टक्के संमती घेणे गरजेचे असते.

माझे काका कमल अग्रवाल यांची दोन मुले असुन अमित व आकाश या दोघांनी २००६ मध्ये अमेरीकेत पायलटचे ट्रेनिंग घेवुन तेथे त्यांनी फेडरेल एव्हिएशन ॲडमिनीस्ट्रशन यांचेकडे अधिपत्याखाली पायलटचे ट्रेनिंग देण्याचे क्लास चालु केले होते.तेथे त्यांनी काहीतरी चुकीचे पेपर केलयाचे फेडरल एव्हिएशन ॲडमिनीस्टेशनला माहित झालयावर त्यांनी २०१०मध्ये अमित अग्रवाल व आकाश अग्रवाल यांचे विरोधात कारवाई केली होती तेव्हा ते दोघे भारतात परत आले. त्यानंतर अमित व आकाश हे कंपनीत काहीही काम करत नव्हते.

सदर सुप्रीम एविएशन कंपनीचे नावाने ऑगस्ट २०१५ मध्ये १ एअरक्राफ्ट १२ कोटीला विकत घेतले. व राजस्थान येथे पॅसेंजर सेवा सुरु केली. सदर एअरक्राफ्ट विकत घेतांना त्यांनी आमची संमती घेतली नाही.तसेच त्यांनी कंपनीचे पेड अप कॅपिटल ७ करोड व अधिकृत कॅपिअल हे १०करोड असे होते.सदर अधिकृत कॅपीटल हे कमल व बाकी लोकांनी १०कोटीवरुन २० कोटी केले त्यासाठी स्पेशल रिझोलयुशनची गरज असतांनाही सदर बाबत त्यांनी आम्हाला काहीही सांगितले नाही.म्हणुन आम्ही त्याबाबत नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल येथे तक्रार दाखल केली आहे.

माझे काका कमल अग्रवाल ,विमल अग्रवाल गिरीश अग्रवाल यांनी सप्टेंबर २०१५ मध्ये अमित व आकाश यांना कोठेतरी कंपनीची मिटींग घेवुन त्यांना कंपनीचे डायरेक्टर म्हणुन घोषित केले. सदर मिटींगबाबत त्यांनी आनंद अग्रवाल ,सतिश अग्रवाल,अरुण अग्रवाल व मला काहीच सांगितले नव्हते. तसेच त्यांनी २०१५मध्ये आमची संमती न घेता तसेच कोणतीही मिटींग न घेता आमचे कंपनीचे अंतर्गत एव्हिएशन डिव्हीजन चालु केली.

R. Agarwal

सुप्रीम ट्रान्सपोर्ट आर्गनायझेशन प्रायव्हेट लिमीटेड कंपनीचे कोटक महिंद्रा बॅकेत खाते क्र. ०२०७२९००००००६४ हे चालु खाते असुन त्यावर कंपनीने लोन घेतलेले आहे. कमल अग्रवाल, विमल अग्रवाल गिरीश अग्रवाल, अमित व आकाश यांनी २०१५ मध्ये त्यांनी आयसीआयसीआय बॅक,एचडीएफसी बॅक, आदीत्य बिरला फायनान्स, ॲक्सीस बॅक, कोटक बॅक, सारस्वत बॅक, ओरीएंटल बॅक, येथे आमच्या कंपनीसाठी लोन घेण्यासाठी अर्ज केले होते.परंतु सदर कंपनीचे काम याअगोदर मी बघत असलयाने तेथील बॅकेचे डायरेक्टर यांचे मला फोन आले म्हणुन मी सदर बॅकाना ईमेल करुन त्यांना आमचे कंपनीचा वाद असुन कोर्टात प्रकरण प्रलंबित असलयाने कर्ज देवु नये सांगितले होते.तरीही आयसीआयसीआय बॅकेने काही लोन डिसबर्स केलयानंतर माझा इमेल गेलयानंतर त्यांनी बाकी कर्ज देणे थाबवले होते.रिलायंस कॅपिटलचेही लोन अप्रुव्ह झाले होते त्यांनीही माझा इमेल केलयानंतर त्यांनी कर्ज देणे थांबवले होते.

कमल अग्रवाल व बाकी डायरेक्टर यांनी बोर्डाची मिटींग न घेता तसेच सर्व डायरेक्टर यांची संमती न घेता ॲक्सीस बॅक,अंधेरी पुर्व शाखा येथे नवीन खाते क्र ९१७०२००२९२८४५१०/ ९१७०२००३३६७९५७९/ ९१७०२००३६५७०४२८ अशी उघडुन बेकायदेशीरपणे ॲक्सीस बॅकेकडुन नविन खात्यावर २४.९० कोटी रुपयांचे कर्ज कोटक बॅकेचे कर्ज देणे असतांनाही घेतले व सदर कर्जातुन सेसना केरवा या नावाची विमान विकत घेतली व ते राजस्थान येथे चालु आहे. सदर विमान विकत घेतांना त्यांनी कंपनीच्या नावाने घेतलेलया कर्जाची किती रक्कम विमानासाठी वापरली याबददल मला काहीही माहिती दिली नाही.तसेच त्यातुन मिळणा—या उत्पन्नाबाबत त्यांनी आम्हाला अदयापपर्यंत काहीही माहिती दिलेली नाही.तसेच नविन कर्ज घेतेवेळी आम्ही आधीच कोटक बॅकेला कर्ज घेतांना तारण ठेवलेलया सिक्युरिटीज जसे sundry debtors, bills receivables, land and property इत्यादी पुन्हा ॲक्सीस बॅकेला तारण ठेवलया. तसेच त्यांनी पनवेल येथील १.५ एकर जमीन जी कोटक बॅकेला तारण ठेवलेली होती तिच जमीन ही ॲक्सीस बॅकेला तारण ठेवली आहे. म्हणुन त्याबाबत मी कोटक बॅकेला त्यांनी कोणत्या कराराने ती प्रॉपर्टी ॲक्सीस बॅकेला दिली याबाबत विचारले असता त्यांनी मला काहीही उत्तर दिले नाही. आमचे अहमदाबाद येथील गोडावुन ही जॉईट प्रॉपर्टी असुन ती तारण ठेवतांना आमची संमती घेतली नाही. कोटक बॅकेत माझी काही वैयक्तीक प्रॉपर्टी गहाण ठेवली असुन सदर वादात माझी वैयक्तीक प्रॉपर्टी धोक्यात जाण्याची शक्यता आहे. तसेच कोटक बॅकेने त्यांची १ वैयक्तिक प्रॉपर्टी मुक्त केली व माझी वैयक्तिक प्रॉपर्टीवर कर्ज ठेवले आहे.तसेच कंपनीचीही काही प्रॉपर्टी मुक्त केली.नियमानुसार वैयक्तिक प्रॉपर्टी प्रथम मुक्त होते नंतर कंपनीची होते.परंतु असे करतेवेळी बॅकेने आमची संमती घेतली नाही.

ॲक्सीस बॅकेने सुप्रीम ट्रान्सपोर्ट कंपनीला कर्ज देण्यापुर्वी मी इमेल करुन कंपनीचे अंतर्गत विवाद चालु असुन नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल येथे तक्रार प्रलंबित आहे तेव्हा कर्जाबाबत कंपनीत कोणतीही चर्चा होत नसुन कुणी कंपनीचे नावाने कर्ज घेण्यासाठी आलयास त्यांना कर्ज न देवु नये असे सांगितले होते तसेच कर्ज घेण्यासाठी कुणी आलयास त्याची माहिती तात्काळ आम्हाला दयावी असेही सांगण्यात आले होते.असे सांगितलयानंतरही ॲक्सीस बॅकेने २४.९०कोटीचे कर्ज सुप्रीम ट्रान्सपोर्ट कंपनीचे नावाने दिले व त्याची माहिती मला रजिस्ट्रार ऑफ कंपनीजच्या वेबसाईटवर मिळालयाबरोबर मी ॲक्सीस बॅकेचे मॅनेजर बिभु मिश्रा, अजली श्रिवास्तव, स्वाती चांडक, आशिष मेहरा,

काफिलुर रहेमान यांना तोच इमेल परत करुन तसेच फोनवरुन त्यांना सांगितले की,तुम्ही एवढे मोठे लोन कसे दिले. तेव्हा त्यांनी त्यांनी उडवाउडवीची उत्तरे देत रिझोलयुशनचे पेपर तसेच कर्जासंबंधी सर्व कागदपत्रे त्यांना मिळाले त्यावरुन त्यांनी लोन दिलयाचे सांगितले म्हणुन मी त्यांना कर्ज घेतेवेळी सादर केलेली कागदपत्रे मला दाखवण्यास विनंती केली असता त्यांनी मी सदर कंपनीचा डायरेक्टर असतांनाही मला कागदपत्रे दाखवण्यास नकार दिला यावरुन ॲक्सीस बॅकेच्या अधिका–यांनी कमल अग्रवाल, विमल अग्रवाल गिरीश अग्रवाल, अमित व आकाश अग्रवाल यांनी सादर केलेली खोटी व बनावट कागदपत्रे याची शहानिशा न करता त्यांचेशी संगनमत करुन कर्ज देवुन माझी फसवणुक केली आहे.

तरी २०१५ ते अदयापपर्यंत श्री कमल अग्रवाल, विमल अग्रवाल गिरीश अग्रवाल, अगित व आकाश अग्रवाल यांनी ॲक्सीस बॅक अंधेरी पुर्व शाखेचे अधिकारी बिभु मिश्रा, अजली श्रिवास्तव, स्वाती चांडक, आशिष मेहरा, काफिलुर रहेमान यांचेशी संगनमत करुन कंपनीचे नियमांचा भंग करुन सुप्रीम टान्सपोर्ट कंपनीचे नावाने ॲक्सीस बॅकेत आमचे संमतीशिवाय नवीन खाते उघडुन व बॅकेला खोटी कागदपत्रे व कंपनीची जॉईंट प्रॉपर्टी गहाण ठेवुन अन्यायाने बुदधीपुरस्सर त्यावर २४.९० कोटीचे कर्ज घेवुन सदर कर्ज घेतेवेळी आमची संमती न घेता,तसेच बॅकेला आमचे कंपनीत विवाद चालु असुन मा.न्यायालयात तसेच नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल येथे तक्रार प्रलंबित असलयाची माहिती देवुनही त्यांनी कर्ज देवुन आमची फसवणुक केली म्हणुन माझी त्यांचेविरोधात कायदेशीर तक्रार आहे.

माझा जबाब मराठीत संगणकावर टंकलिखीत केला असुन तो मला वाचुन हिंदीतुन समजावुन सांगितला असता तो माझे सांगणेप्रमाणे खरा व बरोबर आहे.

समक्ष

[signature]

कविता सोनवणे
पोलिस उपनिरीक्षक
गोरेगाव पोलिस ठाणे,मुंबई

[signature] Rav... Agarwal

स.पो.आ. व.पो.नि. पा.नि. (गुन्हे.

E 7 MAR 2018

781

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ........ फिर्यादीकडून
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य ........
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : —
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यांतील नमुद घटना तारीख वेळी व ठिकाणी यांतील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी यांचे संमतीशिवाय फिर्यादीसह भागीदारीत असलेली सुप्रीम ट्रान्सपोर्ट कंपनीच्या नावाने ॲक्सीस बँकेत नविन खाते उघडून तसेच बँकेला फि यांनी सुप्रीम ट्रान्सपोर्ट कंपनीच्या नावाने कोणतेही कर्ज देवु नये असे सांगितलेले असतांनाही यातील आरोपीत 1 ते 5 यांनी ॲक्सीस बँकेला खोटी कागदपत्रे देवुन २५.१० कोटीचे कर्ज कंपनीचे नावाने फि.चे संमतीशिवाय घेवुन तसेच बँकेनेही कागदपत्रांची शहानिशा न करता तसेच फि यांना कोणतीही माहिती न देता आरोपीत 1 ते 10 यांनी संगनमताने फि यांची फसवणूक केली म्हणून गुन्हा कलम 406, 420, 467, 468, 34 भादवि अन्वये नोंद.

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करुन तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : पोउनि सोनवणे.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........,
Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ........ Rank........ No. ........
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........ (3) Transferred to P.S ........,
District ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.
F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.
(R.O.A.C.)

[signature]

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

[signature]
पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ... कविता सोनवणे
पदनाम Rank ... पोउनि
तपासिक अं. चा कोड. क्र.
Posting
Code No. of I. O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ........
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, ✓ 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.
Attachment to item 7 of **First Information Report**

स.पो आ . व. पो. नि. पा. नि. (गुन्हे)
E 7 MAR 2018

दिनांक :— ०१/०८/२०१८

// जबाब //

श्रीमती अंजली रामबाबू श्रीवास्तव, वय ३१ वर्षे, धंदा — नोकरी, रा.ठी. :— ७०१/निलायम बिल्डींग, निरज सिटी कॉम्प्लेक्स, खडकपाडा, कल्याण (पश्चिम), जिल्हा — ठाणे. संपर्क क्र. ९८२०१३४७६४

—''—

मी वर नमूद प्रमाणे असुन वर नमूद पत्त्यावर सन् २०११ पासुन माझे आई वडिल व भावंडासमवेत रहात असुन मी सन् ०४/०७/२०११ पासुन ॲक्सीस बॅकेच्या दादर येथील एस.एम.ई. (स्मॉल मिडीयम एन्टरप्रायजेस) विभागात असिस्टंट वाईस प्रेसिडंट म्हणुन काम पहात आहे.

गोरेगाव पोलीस ठाणे, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या जा.क्र. ३५६१/१८, दि. २८/०३/२०१८ रोजी अन्वये प्राप्त झालेल्या पत्राच्या अनुषंगाने मी आज रोजी गोरेगाव पोलीस ठाणे येथे चौकशी अधिकारी पो.नि. जयवंत पवार यांचे समक्ष हजर झाले असता पो.नि. जयवंत पवार यांनी मला श्री. रविंद्र अग्रवाल यांचे तक्रारी वरून नोंदविण्यात आलेल्या गु.नों.क्र. १३३/१८, कलम ४०६,४२०,४६७,४६८,३४ भादंविसं. या गुन्हयाची थोडक्यात हकीगत सांगुन सदर गुन्हयामध्ये ॲक्सीस बॅकेने यातील आरोपीत कमल अग्रवाल व इतर यांचे सुप्रिम ट्रान्सपोट या कंपनीस कर्ज मंजूरीच्या प्रोसिजर बाबत विचारणा केल्यावरून मी समक्ष सांगते की,

मी ॲक्सीस बॅकेच्या दादर येथील एस.एम.ई. (स्मॉल मिडीयम एन्टरप्रायजेस) विभागात असिस्टंट वाईस प्रेसिडंट म्हणुन काम पहात आहे. आमच्या विभागाकडून व्यावसायिक कंपन्यांना १० कोटी ते ७५ कोटी रू. पर्यंतचे कर्ज मंजूरीचे काम पाहिले जाते. सदर कर्ज मंजूरीच्या प्रोसेसमध्ये व्यावसायिक कंपनीने उद्योगाच्या कर्जासाठी ॲक्सीस बॅकेच्या आमच्या विभागाकडे प्रस्ताव सादर केल्यानंतर सदर व्यावसायिक कंपनीने सादर केलेल्या कागदपत्रांची खात्री करून, तसेच कंपनीच्या मागील आर्थिक परिस्थितीची खात्री केल्यानंतर कंपनीच्या संचालकांबरोबर मिटींग घेवुन खात्री पटल्यानंतर सदर कंपनीच्या कर्जाचा प्रस्ताव आमच्या कमिटीच्या सदस्यांना सादर करण्यात येतो. त्यानंतर कमिटीच्या सदस्यांकडून कंपनीच्या मागिल आर्थिक परिस्थितीचा आढावा घेवुन खात्री पटल्यानंतर कंपनीच्या कर्जास मंजूरी मिळाल्यानंतर सदरचा प्रस्तावास मंजूरी मिळाल्यानंतर आमच्या विभागाकडून संबधीत कंपनीस त्यांचे कर्ज प्रस्तावास मंजूरी मिळाल्याबाबत कळविण्यात येते. त्यानंतर कंपनीने बॅकेच्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबत हमी दिल्यानंतर आमच्या विभागाकडून संबधीत कंपनीस कर्ज मंजूर केले असुन ते सबंधीत कंपनीस डिस्बस करण्याकरीता आमच्या विभागाकडून बॅकेच्या कॉर्पोरेट बॅकींग ऑपरेशन विभागास प्रस्ताव पुढे पाठविण्यात येतो. त्यांनतर कॉर्पोरेट बॅकींग ऑपरेशन विभागाकडून संबधीत कंपनीकडून कर्जाच्या अटी व शर्ती पूर्ण करून घेतल्यानंतर संबधीत कंपनीस मंजूर करण्यात आलेले कर्ज वितरीत केले जाते.

अशाच प्रकारे मार्च २०१७ मध्ये आमच्या विभागाकडे ' सुप्रिम ट्रान्सपोर्ट ऑर्गनायझेशन प्रा.लि. ' या कंपनीकडून त्यांचे व्यवसायासाठी २५ कोटी रूपये कर्ज मंजूरी करीता प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानंतर आमच्या विभागाकडून नमूद कंपनीने सादर केलेल्या प्रस्तावातील कागदपत्रांची छाननी करण्यात आल्यानंतर कंपनीने कर्जाचे बदल्यात तारण म्हणुन दर्शविण्यात आलेल्या मालमत्तेची खात्री केल्यानंतर ती योग्य असल्याची खात्री पटल्यानंतर आमच्या कंपनीकडून नमूद कंपनीस कर्ज मंजूर करण्यात आले होते.

त्यावेळी सदर कर्ज प्रस्तावाचे कागदपत्रांमध्ये कंपनीने आमच्या बॅकेकडे तारण ठेवण्यासाठी म्हणुन दर्शविलेली अंधेरी (पूर्व), मुंबई, पनवेल व अहमदाबाद येथील स्थावर मालमत्ता, तसेच एक एअर क्राफ्ट अशी मुक्त असल्याची व त्यावर कोणतेही कर्ज नसल्याची आमच्या विभागाकडून खात्री झाल्यानंतर सदर कंपनीचा कर्ज प्रस्ताव मंजूर करण्यास योग्य असल्याची खात्री पटल्यानंतर आमच्या विभागाकडून नमूद कंपनीचा कर्ज प्रस्ताव आमच्या कमिटीच्या सदस्यांकडे पाठविण्यात आला होता. त्यानंतर कमिटीच्या सदस्यांकडून नमूद कंपनीच्या कर्ज प्रस्तावाची छाननी करून त्यांचा प्रस्ताव मंजूर केल्यानंतर आमच्या विभागाकडून नमूद कंपनीस त्यांचे कर्ज मंजूर झाले असुन त्याबाबतच्या अटी व शर्तीचे पत्र पाठविण्यात आले होते.

त्यानंतर 'सुप्रिम ट्रान्सपोर्ट ऑर्गनायझेशन प्रा.लि.' या कंपनीकडून त्यांना कर्जाबाबतच्या अटी व शर्ती मान्य असल्याचे कळविल्यानंतर आमच्या विभागाकडून 'सुप्रिम ट्रान्सपोर्ट ऑर्गनायझेशन प्रा.लि.' यांचे कर्जाचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला असुन त्यांना कर्जाबाबत बॅकेच्या अटी शर्ती मान्य असल्याने त्या पूर्ण करून घेवुन नमूद कंपनीस कर्ज वितरीत करण्यासाठी सदरचा प्रस्ताव आमच्या बॅकेच्या 'कॉर्पोरेट बॅकींग ऑपरेशन विभागास' पाठविण्यात आला होता.

त्यानंतर आमच्या बॅकेच्या कॉर्पोरेट बॅकींग ऑपरेशन विभागाने 'सुप्रिम ट्रान्सपोर्ट ऑर्गनायझेशन प्रा.लि.' या कंपनीकडून कर्जाबाबतच्या सर्व अटी व शर्ती पूर्ण करून घेवुन 'सुप्रिग ट्रान्सपोर्ट ऑर्गनायझेशन प्रा.लि.' या कंपनीस टर्म लोन १२.५० कोटी व इन्वॉइस बिल डिस्काऊन्टींग १२.४० कोटी असे मिळुन एकुण २४.९० कोटी रू. कर्ज मंजूर केले होते परंतू 'सुप्रिम ट्रान्सपोर्ट ऑर्गनायझेशन प्रा.लि.' या कंपनीकडून इन्वॉइस बिल डिस्काऊन्टींग बाबतच्या कंडीशन पूर्ण न झाल्यामुळे नमूद कंपनीस फक्त १२.५० कोटी रू. इतके टर्म लोन ३१ मार्च २०१७ रोजी वितरीत करण्यात आले होते.

सदर कर्ज प्रकरणामध्ये आमच्या बॅकेकडून कोणत्याही नियमांचे उल्लंघन झालेले नसुन तक्रारदार श्री. रविंद्र अग्रवाल यांनी तोपर्यंत आमच्या बॅकेस 'सुप्रिम ट्रान्सपोर्ट ऑर्गनायझेशन प्रा.लि.' या कंपनीस कोणत्याही प्रकारचे कर्ज मंजूर करण्यात येवु नये किंवा त्यांचे खाते आमच्या बॅकेमध्ये उघडू नये याकरीत कोणत्याही प्रकारे संपर्क केला नव्हता. दिनांक ३१/०३/२०१७ रोजी 'सुप्रिम ट्रान्सपोर्ट ऑर्गनायझेशन प्रा.लि.' कंपनीस आमच्या बॅकेकडून १२.५० कोटी रू. इतके टर्म लोन वितरीत करण्यात आल्यानंतर श्री रविंद्र अग्रवाल यांनी आमच्या बॅकेच्या अंधेरी पूर्व, मुंबई येथील अधिकारी श्री. बिभू मिश्रा यांना 'सुप्रिम ट्रान्सपोर्ट ऑर्गनायझेशन प्रा.लि.' यांचे ॲक्सीस बॅकेत करंट अकाऊंट व कर्जाबाबत तक्रार केली होती. म्हणुन श्री. बिभू मिश्रा यांनी दिनांक ३१/०५/२०१७ रोजी तात्काळ कार्यवाही करून 'सुप्रिम ट्रान्सपोर्ट ऑर्गनायझेशन प्रा.लि.' या कंपनीचे बॅकेतील करंट अकाऊंट फ्रिज केले होते. त्यामुळे 'सुप्रिम ट्रान्सपोर्ट ऑर्गनायझेशन प्रा.लि.' या कंपनीस त्यांचे व्यवहार पूर्ण करण्यास अडचणी निर्माण झाल्यामुळे कंपनीच्या डायरेक्टर्सने चौकशी केली असता त्यांचे अकाऊंट फ्रिज केल्याचे समजल्यावर त्यांनी चौकशी केली असता बॅकेने त्यांना श्री. रविंद्र अग्रवाल यांचे तक्रारीवरून त्यांचे कंपनीचे अकाऊंट फ्रिज केल्याबाबत कळविले.

त्यानतर कंपनीचे डायरेक्टर श्री. कमल अग्रवाल यांनी श्री. रविंद्र अग्रवाल यांचा त्यांचे कंपनीबरोबर काही संबध नसल्याचे सांगुन त्याबाबत सिटी सिविल कोर्ट, दिंडोशी मुंबई येथे श्रीमती सिमा सुमित पहाडे यांनी केलेल्या दाव्याचे सुनावणीच्या निकालाची प्रत, तसेच एन.सी.एल.टी. प्राधिकारणाचे सुनावणीतल आदेशाची प्रत ॲक्सीस बॅकेतील आमच्या विभागाकडे सादर केली. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता सिटी सिविल कोर्ट, दिंडोशी यांचे आदेशामध्ये श्री. रविंद्र अग्रवाल यांनी सिमा पहाडे यांच्या वडिलांच्या शेअर्सवर हक्क दाखविलेला ग्राहय नसल्याचे स्पष्ट नमूद आहे. तसेच एन.सी.एल.टी. प्राधिकारणाच्या आदेशामध्येही श्री. रविंद्र अग्रवाल यांचे वतीने त्यांचे वकीलांनी रविंद्र अग्रवाल हे कोणत्याही बॅकेस पत्रव्यवहार करणार नाहीत अशी हमी दिल्याचे स्पष्ट नमूद आहे. सदर दोन्ही कागदपत्रांच्या प्रती मी नंतर सादर करेन.

त्यानंतर श्री. बिभू मिश्रा यांनी सदर प्रकरणी श्री. रविंद्र अग्रवाल यांना ई–मेल द्वारे 'सुप्रिम ट्रान्सपोर्ट ऑर्गनायझेशन प्रा.लि.' यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरून त्यांचे बॅकेतील खाते अधिकृत असल्याने ते पुन्हा खुले करत आहोत तरी ते खुले करण्यापूर्वी तुमच्याकडे आणखी काही पुरावे असल्यास सादर करावे असे कळविले होते परंतू त्यानंतर श्री. रविंद्र अग्रवाल यांनी कोणतेही कागदपत्र बॅकेस सादर न केल्याने ०५/०८/२०१७ रोजी 'सुप्रिम ट्रान्सपोर्ट ऑर्गनायझेशन प्रा.लि.' या कंपनीचे बॅकेतील खाते खुले करण्यात आले होते.

01/08/2018

तरी आमच्या बँकेकडून 'सुप्रिम ट्रान्सपोर्ट ऑर्गनायझेशन प्रा.लि.' या कंपनीस कोणत्याही प्रकारे गैरमार्गाने कर्ज मंजूर करून ते वितरीत करण्यात आलेले नसुन ते कंपनी कडून प्रस्ताव सादर करण्यात आल्यानंतर. सदर प्रस्तावाची बँकेच्या नियमांप्रमाणे पुर्णपणे खात्री करून सदरची कंपनी कर्ज देण्यास पात्र असल्याची पूर्ण खात्री पटल्यानंतरच नमूद कंपनीस कर्ज मंजूर करण्यात आले आहे. नमूद कंपनीने कर्ज मंजूर करण्यापूर्वी बँकेत प्रस्ताव सादर केलेल्या कागदपत्रातील कंपनीच्या बोर्ड रिजॉल्यूशन ची छायाकित प्रत व कंपनीस बँकेकडून पाठविण्यात आलेल्या सॅक्शन लेटरची छायांकीत प्रत चौकशीकामी सादर करत आहे.

माझा सदरचा जबाब संगणकावर मराठीत संगणकीकृत करण्यात आला असुन तो मला वाचुन दाखवुन समजावुन सांगितला तो मी सांगितल्या प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

( जयवंत पवार )
पोलीस निरीक्षक
गोरगाव पोलीस ठाणे, मुंबई.

1/8/2018